महा पारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित.,

CIN No. U40109MH2005SGC153646


प्रेषक :
कार्यालयाचे नांव : कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, कराड
कार्यालयीन पत्ता : प्रशासकीय इमारत, तळमजला विजयनगर कराड
पो.सुपने ता.कराड जि.सातारा पिन.नं.४१५११४
दुरध्वनी : का. ०२१६४ २५५१९९ वै. ०२१६४ २५५०४७
E mail ee3110@mahatransco.in Web Site : www.mahatransco.in


जा.क्र. काअ/अउदा संवसु विभाग/कराड/मासं/U/ No - 0943 दि. 27 OCT 2021

## जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अऊदा संवसु विभाग, कराड अंतर्गत आय.टी.आय. वीजतंत्री शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे. या करीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून पात्र विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी दि. ११.११.२०२१ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना नोंदणी क्रमांक E03212700871 वर नोंदणी करुन अद्यावत प्रोफाईलसह ऑनलाईन अर्ज सादर (Apply) करावा.

| आस्थापनेचा नोंदणी क्र. (Registration) | ट्रेड (Trade) | एकुण जागा |
|---|---|---|
| E03212700871 | वीजतंत्री | ४० |

१. ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दि. ११.११.२०२१ चे रात्री २३.५९ वाजेपर्यंत राहील.
२. शैक्षणिक अर्हता - महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (इयत्ता १० वी) असणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
३. विद्यावेतन प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.
४. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधनकारक राहणार नाही.
५. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहील.
६. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेले नाव सुसंगत असावे.
७. एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका (04 सत्रांची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने प्रोफाईल मध्ये आधारकार्ड प्रमाणिकरण (Aadhaar Verification) करून घेणे बंधनकारक आहे.
९. उमेदवाराची सही, पालकांची सही, जातीचा प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. गुण, आय.टी.आय गुण ही माहिती अचूक भरण्यात यावी सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

...कृपया मागे पहा

...मागील पानावरून पुढे

१०. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

११. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन कॉफी जोडून योग्य रितीने ऑनलाईन अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. उमेदवाराचे वय दि.२७.१०.२०२१ रोजी १८ वर्षे पूर्ण असावे.

१३. ऑनलाईन अर्ज सादर करताना उमेदवाराने सद्य:स्थितीत कार्यान्वित असणारा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. ई-मेल आयडी कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१४. दि.११.११.२०२१ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१५. आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१६. केवळ शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१७. ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांना दस्तऐवज /शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करीता ई-मेलव्दारे दिनांक, वेळ व स्थळ कळविण्यात येईल. त्याकरीता खाली नमूद केलेल्या दस्तऐवजांसह व शैक्षणिक कागदपत्रांसह उमेदवारांनी उपस्थितीत रहावे.

अ. पासपोर्ट साईज फोटो-२ (रंगित)

ब. ऑनलाईन नोंदणीचे दस्ताऐवज **(Apprentice Profile)** व शैक्षणिक कागदपत्रे (मुळ प्रती)

क. शाळा सोडल्याचा दाखला.

ड. एस.एस.सी बोर्ड प्रमाणपत्र.

इ. आय.टी.आय गुणपत्रका (चारीही सत्र)

ई. मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र.

उ. आधारकार्ड व बँक पासबुक (मुळ प्रत)

१८. सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे वेळोवेळी प्रसारीत केलेले संबंधित परिपत्रके, नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

१९. उमेदवारांची निवड एस.एस.सी. गुण व आय.टी.आय. चे चारही सत्रांच्या गुणांची बेरीज आणि त्यांची सरासरीनुसार होईल व मौखिक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

एस.टी.जाधव
कार्यकारी अभियंता
अऊदा संवसु विभाग, कराड